**नियमित दिवाणी दावा क्र.२९९/२०२५ मधील नि.७० खालील आदेश**
**दिलीप भोपते वगैरे वि. मा. जिल्हाधिकारी सो, सातारा वगैरे**
**CNR NO.MHST050004172025**

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

वादीने सदरचा दावा हा प्रतिवादींचे विरुध्द जाहीर ठराव व ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.११ चे नाव “भारत पेट्रोलियम” ऐवजी “इंडियन पेट्रोलियम” असे असल्यामुळे वादीस दुरुस्ती करणे भाग पडले आहे. तसेच प्रतिवादी क्र.१२ चे नाव “इंडीयन पोस्ट ऑफीस” दावा मिळकतीमध्ये दावा दाखल करण्यापूर्वी होते परंतु सध्या इंडीयन पोस्ट यांचे ऑफीस दावा मिळकतीमधून स्थलांतर झाले असल्यामुळे सदर प्रतिवादीस या दाव्यातून वगळणे/कमी करणे गरजेचे झाले आहे. सदर दुरुस्ती फॉर्मल स्वरुपाची असून सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. म्हणून वादीने अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे. प्रतिवादीने सदर अर्जास त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत नोंदविली आहे.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता सदरचा दावा हा जाहीर ठराव व ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. नियोजित दुरुस्ती ही दावा गुणदोषावर निकाली होणेकरीता आवश्यक आहे. तसेच दाव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीताही दुरुस्ती आवश्यक आहे. सदरचा दावा अद्याप चौकशीकरीता लागलेला नाही. वादीने मागितलेली सदरची दुरुस्ती ही आवश्यक असल्यामुळे सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. नियोजित दुरुस्ती झालेस प्रतिवादी यांचे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट

अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल. त्यामुळे वादींचा अर्ज मंजूर करणे मला न्यायोचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्त करावा व दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

JYOTI JAGNNATH MANE
Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2025.10.09 11:03:32 +0530

ठिकाण – कराड　　(जे.जे.माने)
दिनांक – ०८/१०/२०२५　　४ थे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड